संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# कुपोषणाची शिकार म्हणजे हिंसाचारच

भारतातील वाढती लोकसंख्या हा नेहमीच चिंतेचा आणि काळजीचा विषय राहिलेला आहे. या लोकसंख्येतील भौगोलिक स्तरावरची विषमता हा आणखीनच स्वतंत्र विषय ठरतो. सव्वाशे कोटी लोकसंख्येच्या या देशात केवळ दारिद्र्य आणि गरिबी ही एकमेव समस्या नसून, जन्माला येणाऱ्या लहान मुलांमधील कुपोषितपणा ही अधिक आव्हानात्मक समस्या ठरते. अलीकडेच राष्ट्रीय स्तरावर झालेल्या एका सर्व्हेक्षणानुसार देशातील तब्बल ५८ टक्के लहान मुले ही कुपोषित असल्याचा धक्कादायक निष्कर्ष पुढे आला आहे. यापैकी ३८ टक्के मुलं ही अशक्त तर २१ टक्के मुलं कमी वजनाची असल्याचे आढळून आलेले आहे. ज्या वयामध्ये मुलांची शारीरिक आणि मानसिक वाढ अपेक्षित असते, त्या काळातच त्यांना जर योग्य आणि पुरेसे संरक्षण मिळाले नाही किंवा त्यांची काळजी घेतली गेली नाही, तर भविष्यकाळात संपूर्ण पिढीही कुपोषित किंवा शारीरिक मानसिकदृष्ट्या कमकुवत राहण्याची भीती असते. अर्थातच याकरिता आईच्या गर्भारपणाच्या काळातदेखील योग्य काळजी घेतली जाणे आवश्यक असते. दुर्दैवाने आपल्या देशात ४० टक्के लोक दारिद्र्य रेषेखाली राहतात. अत्यंत हलाखीमध्ये जीवन कंठणाऱ्या या मातांना गर्भारपणाच्या काळात योग्य प्रकारचा पोषण आहार मिळत नाही. उलट याही काळात काबाडकष्ट करूनही पुरेसे जीवनसत्त्व त्यांच्या शरीरात जात नाही. यावरून इतक्या मोठ्या संख्येने भारतातील लहान मुले कुपोषित का राहतात, याचे सहजपणाने उत्तर मिळते. आज भारतात साडेबारा कोटी लहान मुले आहेत. त्यापैकी जवळपास सव्वासात कोटी मुलं अनेक दृष्टींनी कुपोषित राहात आहेत. सरकारी पातळीवरून केले जाणारे प्रयत्न किती अपुरे आहेत, हेच या आकडेवारीवरून सिध्द होते. देशातील बेरोजगारी आणि अपुऱ्या उत्पन्नामुळे कुटुंबात योग्य तो आहार घेता येत नाही. शिवाय सरकारकडून जे प्रयत्न होतात, तेदेखील या दारिद्र्य रेषेखालील लोकांपर्यंत पोहचत नाही. म्हणजेच सरकारी पातळीवरचा भ्रष्टाचार आणि गैरव्यवहारसुध्दा या कुपोषणाला तितका जबाबदार ठरतो. या आकडेवारीने किंवा सर्व्हेक्षणाने केवळ सरकारच नव्हे, तर विविध सामाजिक संस्था आणि प्रसारमाध्यमांचे डोळे उघडायला हरकत नाही. निम्म्यापेक्षा जास्त मुले अशा प्रकारच्या दुर्दैवी समस्येचे बळी ठरत असतील, तर आजच्या पुढारलेल्या किंवा माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगातली ही केवढी मोठी शोकांतिका म्हणावी लागेल.

### भ्रष्टाचाराचाच परिणाम

जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश म्हणून भारताचा उल्लेख केला जातो. परंतु, क्रमांक एकचा चीन देशसुध्दा जर तिथल्या लोकांची किंवा बालकांची पुरेशी काळजी घेऊ शकत असेल, तर ते भारताला का शक्य होऊ नये, असा प्रश्न पडतो. गेल्या काही वर्षापासून भारताला महासत्ता होण्याची स्वप्ने पडत आहेत. स्वप्ने पाहण्यात काही गैर नाही. परंतु, स्वप्नांचेच उदात्तीकरण करत राहणे आणि वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करणे अशीच आपल्या राज्यकर्त्यांना सवय लागली आहे. ५२ टक्के मुलांना आपण योग्य पध्दतीने आहार देऊ शकत नाही, ही अतिशय लज्जास्पद गोष्ट ठरते. याच देशामध्ये रोज १५ टक्के अन्न वाया जाते किंवा फेकून द्यावे लागते. तर दरवर्षी ९० हजार टन अन्न धान्य साठवणुकीची पुरेशी जागा नसल्यामुळे सडून खराब होते. हा प्रकार आणि बालकांवर कुपोषित राहण्याची येणारी वेळ यातला परस्पर विरोध आणखीनच गंभीर ठरतो. सरकारी योजना या इतक्या विचित्र स्वरूपाच्या आहेत, की, सामान्य माणसाला त्याच्या हक्काचे अन्न धान्यसुध्दा त्या मिळू देत नाहीत. कुपोषणाची ही समस्या प्रामुख्याने शहरांमधल्या झोपडपट्ट्यांमध्ये तर ग्रामीण भागातल्या आदिवासी भागामध्ये अधिक असल्याचे आढळून आले आहे. सरकारतर्फे शाळांमध्ये पोषण आहार दिला जातो. प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या माध्यमातून गर्भवती महिलांसाठीही पोषण आहाराची योजना असल्याचे सांगितले जाते. परंतु, प्रत्यक्षात या योजनेचा लाभ किती टक्के लोकांना होतो, हा संशोधनाचा विषय ठरतो आणि म्हणूनच जे अन्नधान्य थेट गरिबाच्या घरापर्यंत पोहचायला हवे ते मधल्यामध्ये नाहीसे होते. अलीकडे सरकारने आधारकार्डाच्या माध्यमातून गरिबांना दिला जाणारा मदतीचा निधी थेट त्यांच्या बँक खात्यात जमा करण्याचा प्रयोग सुरू केला आहे. त्या पैशाचा वापर करून लोकांनी अन्नधान्य घ्यावे, असा हेतू असतो. परंतु, ज्या गरिबाला पैशांची गरज असते, ते पैसे नेमके त्याच कारणासाठी वापरेल याची शाश्वती नसते. याशिवाय सरकारमान्य रेशन दुकानातून दिल्या जाणाऱ्या अन्नधान्याचाही काळा बाजार होतो. या सर्व पध्दतीमधून सामान्य माणसाला थेट लाभ पोहचू शकत नाही.

### महाराष्ट्राचेही तेच

अगदी आपल्या महाराष्ट्राचेसुध्दा अतिशय वाईट अनुभव आहेत. अन्य राज्यांपेक्षा स्वतःला प्रगत म्हणवणाऱ्या महाराष्ट्रात दरवर्षी काही हजार मुलांचा कुपोषणामुळे मृत्यू होतो. आदिवासी भागात विशेष समाजकार्य केलेल्या डॉ. अभय बंग यांनी याबाबतचा अहवाल दहा वर्षांपूर्वीच सरकारला सादर केला होता. आदिवासी भागांमधील जवळपास ३५ हजार मुले दरवर्षी कुपोषित राहतात, असे त्यांनी आकडेवारीनिशी दाखवून दिले होते. याचा अर्थ आदिवासी भागातील अन्नधान्याचा पुरवठा किंवा आदिवासींसाठी राबवल्या जाणाऱ्या विविध योजना त्यांच्यापर्यंत पोहचू दिल्या जात नाहीत, असाच त्यातून अर्थ निघतो. महाराष्ट्रासारख्या राज्याची ही परिस्थिती असेल तर ज्यांना बिमारू म्हणून ओळखले जाते त्या बिहार, मध्यप्रदेश, ओरिसा आणि उत्तरप्रदेश या राज्यांची काय परिस्थिती असेल, याची आपण कल्पना करू शकतो. आज आरोग्य किंवा आदिवासी कल्याण अशा सगळ्या विभागांचा खर्चाचा आकडा बघितला तर तो अब्जावधीमध्ये जातो. मात्र, या सगळ्या पैशाचा योग्य कारणासाठी विनियोग होत नाही. कुपोषणाचा हा आकडा भ्रष्टाचाराचेच प्रमाण दाखवून देतो. सुजलाम, सुफलाम म्हणून गौरव करणाऱ्या या भारत देशामध्ये जन्माला येणारे किंवा कोवळ्या वयाची मुले कुपोषणाची शिकार होत असतील, तर हादेखील हिंसाचाराचाच भाग म्हणावा लागेल.